## फौ. प्र.सं. १९७३ चे क्र.२०४ अन्वये निशाणी क्रमांक ०१ वर आदेश

(पारीत केलेला दिनांक २२.०३.२०२४)

०१. फिर्यादपत्रक, फिर्यादीची **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २००** प्रमाणे नोंदविलेली शपथेवरील तपासणी **नि.क्र.०६** व फिर्यादपत्रकासोबतची कागदपत्रे विचारात घेतली. फिर्यादीतर्फे विद्वान विधीज्ञ **श्री. व्ही. एम. वागदरे** यांचा युक्तिवाद ऐकला.

०२. फिर्यादीपत्रक व फिर्यादीच्या तपासणीवरुन आरोपीने भारतीय स्टेट बँक शाखा उजनी या त्याच्या खाते क्रमांक **४०३६१५०४४३१** खात्यावरील दिनांक **०३.१०.२०२३** रोजीचा रक्कम रुपये **०१,८२,५६३/-** फक्तचा धनादेश क्रमांक **९६८५५९** फिर्यादीला कायदेशीर जबाबदारी परतफेड करण्यासाठी दिल्याचे दिसते. सदर धनादेश फिर्यादीने आय. सी. आय. सी. आय. बँक शाखा, औसा येथील त्यांच्या खात्यात वटविण्यासाठी दिनांक **०३.१०.२०२३** रोजी सादर केले असता सदर धनादेश दिनांक **०५.१०.२०२३** रोजी न वटता बॅकेच्या **'अपुरा निधी' (Insufficient Funds)** या शे-यासह परत आल्याचे दिसते.

०३. फिर्यादीने आरोपीला दिनांक **१९.१०.२०२३** रोजी विधिज्ञांमार्फत पाठवलेली मागणी नोटीस त्याने दिनांक **२७.१०.२०२३** रोजी मिळूनही त्याने पुढील १५ दिवसात फिर्यादीला धनादेशाची रक्कम दिली नाही. म्हणून आरोपीने प्रथमदर्शी **चलनक्षम दस्तऐवज अधिनियम, १८८१ चे कलम १३८** अन्व्ये दंडनीय गुन्हा केल्याचे दिसते. म्हणून **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १९० (१) (अ)** नुसार गुन्हयाची दखल घेण्यात येते. आरोपीविरुध्द आदेशिका जारी करण्यास पुरेसे कारण आहे अशी माझी खात्री झाली आहे. म्हणून खालील आदेश पारीत करणे न्यायाचे होईल.

### आदेश

(अ) आरोपीविरुध्द ***फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०४ अन्वये चलनक्षम दस्तऐवज अधिनियम, १८८१ चे कलम १३८*** नुसार दंडनीय गुन्हयासाठी आदेशिका जारी करण्यात येते.

(आ) आरोपीला समन्स काढावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Subhash Laxman Phule
Date: 2024.03.22 15:59:08 +0530

**(श्री. सुभाष एल. फुले)**
**प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, औसा,**
**जिल्हा लातूर.**

**दिनांक २२.०३.२०२४.**
**ठिकाण: औसा.**